पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे शहर कार्यालय
सावित्रीबाई शिवरकर बहुउद्देशिय हॉल, शिवरकर रोड, वानवडी, पुणे ४०.

फोन नं. ०२० २६८६१२१४
इ-मेल - dcpzone5.pu-mh@gov.in

जा.क्र./पोउआ/परि-५/ /२०२५ पुणे शहर. दिनांक / /२०२५

**प्रेस नोट दिनांक :- २७/०२/२०२५**

**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०५ यांचेकडुन एकुण ५ सराईत गुन्हेगारांवर तडीपार कारवाई**

पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील गुन्हेगारीवृत्तीस आळा घालणेकामी व गुन्ह्यांना प्रतिबंध करणेकामी पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांवर ठोस व परिणामकारक अशी कारवाई करणेबाबत आम्ही परिमंडळ ५ कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशनला आदेश दिलेले होते. सदर आदेशास अनुसरुन परिमंडळ ५ कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनकडील सराईत गुन्हेगारांवर दि. २७/०२/२०२५ रोजी महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ५६ प्रमाणे तडीपार करण्यात आले आहे.

खालील नमुद सराईत गुन्हेगारांना पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहर व पुणे ग्रामिण जिल्ह्याचे हद्दीतुन ०२ वर्षे कालावधीकरीता तडीपार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | आरोपी नाव | तडीपार कालावधी |
|---|---|---|---|
| १. | हडपसर | किशोर अमर सोळंकी, वय २१ वर्षे, रा. बिराजदारनगर, गल्ली नं. ३, कॅनॉल जवळ, वैदुवाडी, हडपसर, पुणे **(जबरी चोरी, गंभीर दुखापत, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, विनयभंग यासारखे एकुण ०४ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरीता |
| २. | हडपसर | अक्षय अनिल पवार, वय २७ वर्षे, रा. वेताळबाबा वसाहत, कॅनॉलच्या डाव्या बाजुला, हडपसर, पुणे **(दुखापत, जबरी चोरी यासारखे एकुण ०३ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरिता |
| ३. | कोंढवा | कादीर उर्फ काजु आरीफ अन्सारी, वय २१ वर्षे, रा. भाग्योदयनगर, गल्ली नं. २, बुशरा अपार्टमेंट, फ्लॅट नं. १३, कोंढवा खुर्द, पुणे **(खुनाचा प्रयत्न, दुखापत, जबरी चोरी, चोरी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे यासारखे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरिता |
| ४. | बिबवेवाडी | साहील रफीक कलावगी, वय २१ वर्षे, रा. राजीव गांधीनगर, जुना बस स्टॉपजवळ, स्वामी समर्थ चाळ, अप्पर बिबवेवाडी, पुणे **(खाजगी मालमत्तेचे नुकसान, मारहाण, धमकावणे, वहशत निर्माण करणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, विनयभंग यासारखे एकुण ०३ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरिता |
| ५. | मुंढवा | करण हरीदास जाधव, वय २४ वर्षे, रा. सर्वोदय कॉलनी, मुंढवा, पुणे **(जबरी चोरी, दरोडा तयारी, चोरी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, विनयभंग यासारखे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत.)** | ०२ वर्षाकरिता |

उपरोक्त सर्व तडीपार इसम हे २१ ते २५ वयोगटातील सराईत गुन्हेगार आहेत. सन २०२५ मध्ये यापुर्वी ०६ गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले आहे. परिमंडळ ५ कार्यक्षेत्रातील १०० हुन अधिक गुन्हेगारांच्या हालचालींवर

पोलीसांचे बारकाईने लक्ष आहे. सराईत गुन्हेगारांना गुन्हे करण्यापासुन परावृत्त करण्यासाठी व गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आमचे रडारवरील आणखी १०० हुन अधिक गुन्हेगारांवर मोका, एमपीडीए, तडीपारीची कारवाई करणार आहोत.

वरीलप्रमाणे तडीपार करण्यात आलेले सराईत गुन्हेगार हे त्यांचे हद्दपार कालावधीमध्ये **पुणे शहर पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हयामध्ये** दिसुन आल्यास तात्काळ **पोलीस नियत्रंण कक्ष संपर्क क्र. ११२** तसेच जवळील अथवा संबंधित पोलीस ठाणेस किंवा इकडील **कार्यालयात संपर्क क्र. ०२०-२६८६१२१४** यावर संपर्क साधुन माहिती कळविण्याबाबत आम्ही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे शहर सर्व नागरीकांना आवाहन करीत आहोत.

27/02/25

**डॉ. राजकुमार शिंदे** (भा.पो.से.)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५,
पुणे शहर.